[विशेष–ब. आ. (मुं. शा. मि.) ५०-म.

No 043454

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०**

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महा. 823/2011/पुणे.
दि. 4/5/11/पुणे.

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, ब्रम्हचैतन्य एज्युकेशन सोसायटी

ग. नं: 1307, 1308, 1309, मु. पो. कारेगाव, ता. शिरुर, जि. पुणे

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली. अर्जदार - श्री राहुल ईश्वर तावरे.

तारीख : 4/5/11 २० रोजी माझ्या सहीनिशी दिले.

Asstt. Registrar of Society, Pune Region, Pune

संस्थांचे सहायक निबंधक,
सहायक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे विभाग.

[ विशेष–ध. आ. (मुं. सा. वि.) २-म.

४४

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये पुणे विभाग, पुणे. येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव ब्रम्हचैतन्य एज्युकेशन सोसायटी घर नं. १३०५, १३०६, १३०९, मु. पो.- कारेगांव, ता.- शिरुर जि.- पुणे,

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ - २९४९१ (पुणे)

श्री. राहुल ईश्वर तावरे यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक १४-९-११ ~~२००~~ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

Deputy Charity Commissioner ★ Pune ★

सही ........

पदनाम धर्मादाय उप आयुक्त
पुणे विभाग, पुणे

महा. ८२३ /2011/पुणे.
दि. २/५ /11/पुणे.

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

९

# परिशिष्ट क

## ब्रम्हचैतन्य एज्युकेशन सोसायटी या संस्थेची नियम व नियमावली :—

Deputy Charity Commissioner Pune

### १. नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या : —

नियमावली म्हणजे **ब्रम्हचैतन्य एज्युकेशन सोसायटी** हया संस्थेची मान्य केलेली नियम व नियमावली होय.

कार्यकारी मंडळ म्हणजे या संस्थेचे ज्ञापनात निर्दिष्ट केलेले पहिले कार्यकारी मंडळ व तदनंतर या नियमावलीचे तरतूदीनुसार निवडून येणारे कार्यकारी मंडळ होय.

सभासद म्हणजे या नियमावलीतील तरतूदीनुसार कार्यकारी मंडळ ज्या व्यक्तिस सभासदत्व बहाल करील अशी व्यक्ती.

सर्व साधारण सभा म्हणजे सर्व सभासदांची मिळून वर्षातून एकदा होणारी सभा होय.

### २. कार्यक्षेत्र : —

संस्थेचे कार्यक्षेत्र हे पुणे जिल्हा महाराष्ट्र राज्य व भारत भर राहील.

### ३. हिशोबाचे वर्ष : —

संस्थेचे आर्थिक वर्ष हे १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर राहील.

### ४. सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत : —

संस्थेचे कार्यक्षेत्रातील उद्देश मान्य असणाऱ्या १८ वर्षावरील व्यक्तिस कार्यकारी मंडळाचे मान्यतेने सभासद होता येईल.

### ५. सभासदाचे प्रकार : —

१. **संस्थापक सभासद : —** ज्या सभासदांनी एकत्र येऊन ही संस्था स्थापन केली असून, ज्यांची नांवे ज्ञापनात नमूद आहेत ते सर्व सभासद संस्थापक सभासद समजणेत येईल.
२. **साधारण सभासद : —** जो सभासद वार्षिक वर्गणी रू १००१/— अक्षरी एक हजार एक मात्र भरील त्यास साधारण सभासद समजण्यात येईल.
३. **आजीव सभासद :—** श्री. राहूल ईश्वर तावरे, श्री. अशोक वसंतराव नवले, श्री. दिनेश अशोक नवले व श्री. संतोष गंगाराम जाधव हे आजीव सभासद राहतील.
४. **हितचिंतक समासद :—** संस्थेचे कामकाम व योजनेचे विस्तारासाठी रु एक हजार ते पाच हजार वर्गणी देणारास हितचिंतक सभासद करण्यात येईल.

### ६. सभासदत्व रद्द होणे : —

१. जर सभासद वर्गणी आर्थिक वर्षाचे सुरवातीस न भरल्यास.
२. राजीनामा दिला अगर मृत पावल्यास.
३. कार्यकारी मंडळाचे पुर्वपरवानगी शिवाय सहा महने संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर राहिल्यास.
४. नैतिक गुन्हयाबद्दल फौजदारी खटल्यात शिक्षा झाल्यास अथवा नादार ठरल्यास.
५. संस्थेचे हिताविरूध्द वर्तन केल्याचे सिध्द झाल्यास.

अध्यक्ष | अ. वी. नवले उपाध्यक्ष | सचिव

## ७. सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार आणि कार्य : —

१. सर्वसाधारण सभा वर्षातून एकदा आर्थिक वर्ष संपलेनंतर तीन महिन्याचे आत घेणेत यईल.
२. दर पाच वर्षाचे कार्यकारी मंडळाची निवड करणे.
३. कार्यकारी मंडळाचे कार्याचा आढावा घेणे व पुढील वर्षाकरीता कार्याची रूपरेषा ठरविणे.
४. हिशोब तपासनिसाची निवड करणे.
५. कार्यकारी मंडळास आवश्यक ते अधिकार बहाल करणे.
६. नियम व नियमावलीत बदल करणे, वाढ करणे अथवा कमी करणे.

Deputy Charity Commissioner Pune

## ८. सर्वसाधारण सभेची सुचना आणि गणसंख्या : —

सभेपुर्वी किमान पंधरा दिवस अगोदर सचिव अशा सभेची सुचना काढतील ज्यामध्ये सभेचे ठिकाण, वेळ व विषय नमूद असेल.

एकूण सभासदांपैकी ३/५ सभासद सभेस हजर असतील तर गणपुर्ती झाल्याचे समजण्यात येईल. सभेचे नियोजित वेळेनंतर अर्धा तास गणपुर्ती न झाल्यास हजर सभासदांमध्येच सभा घेणेत येईल व अशा तहकुब सभेस मान्य झालेले ठराव वैद्द समजण्यात येईल.

## ९. विशेष सर्वसाधारण सभा व कार्य : —

एकूण सभासदांपैकी २/३ सभासदांनी लेखी मागणी केल्यास विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्यात येईल व ज्या कारणास्तव अशी सभा बोलविण्यात आली असेल त्यावरच फक्त चर्चा करणेत येईल.

## १०. संस्थेचे कार्यकारी मंडळ व पदाधिकारी यांची रचना : —

संस्थेचे कार्यकारी मंडळ हे कमीत कमी **९** व जास्तीत जास्ती **१३** सभासदांचे मिळून राहील व त्यामधूनच अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, सदस्य असे पदाधिकारी यांची निवड करतील.

## ११. कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत : —

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा राहील व सर्व साधारण सभेत गुप्त मतदान पध्दतीने कार्यकारी मंडळ निवडले जाईल.

## १२. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये : —

| | |
|---|---|
| अध्यक्ष | संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे सर्व सभांचे अध्यक्षस्थान स्विकारणे इ. संस्थेच्या दप्तराचा ताबा ठेवणे, पदाधिकाऱ्यांना त्यांचे कार्याचे वाटप करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे. |
| उपाध्यक्ष | अध्यक्षाचे गैरहजेरीत त्यांची सर्व कामे पहाणे व संस्थेचे व्यवस्थेवर व कारभारावर लक्ष ठेवणे.अध्यक्षांना त्यांच्या कामात मदत करणे व कार्यक्रमाचे सुत्रसंचलन करणे. |
| सचिव | संस्थेचे अस्थापना विषयक सर्व कामे अध्यक्षांचे संमतीने पहाणे, प्रत्येक सभेच्या सूचना काढणे वृतांत लिहिणे, ऑफिस रेकॉर्ड ठेवणे, पत्रव्यवहार करणे, संस्थेची व्यवस्था व नवीन निर्माण होणारे संस्थेचे दप्तर, सर्व कागदपत्र व्यवस्थीत ठेवणे. तसेच संस्थेच्या कार्यकारणीचे ठराव अंमलात आणतील, कार्यवाही करतील. निधी गोळा करुन त्याच्या पावत्या देणे, सवसाधारण सभेत सादर करणे, त्यास मंजूरी घेणे, तक्रारीचे निवारण करणे, कोर्ट कचेरीची कामे पहाणे व त्याचा निर्णय विचारविनियम कार्यकारी मंडळाचे सभेत मांडणे इ. कामे करणे. विधीसल्लागार नेमणूकीसाठी मंजूरी घेणे |
| खजिनदार | खजिनदाराने संस्थेचे कामात सहकार्य करणे, संस्थेचे आर्थिक व्यवहारात मदत करणे, सांभाळणे, वसुलीकरणे, हिशोब लिहीणे व तपासून पहाणे, अंदाजपत्रक तयार करणे. |
| सदस्य | संस्थेचे कार्यकारी मंडळाशी सल्लामसलत करुन संस्था संघटीत करणे. |

Deputy Charity Commissioner

## १३. कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा –

कार्यकारी मंडळेची सभा साधारण तीन महिन्यातून एकदा घेणेत येईल. कार्यकारी मंडळातील २/३ सभासदांनी अध्यक्षांकडे लेखी मागणी केल्यास मागणी सभा घेणेत येईल व अशा सभेस ज्या कारणास्तव मागणी केली त्यावरच चर्चा करणेत येईल.

## १४. कार्यकारी मंडळाची सभेची सुचना व गणसंख्या –

कार्यकारी मंडळाची सभेची सुचना सभेपुर्वी किमान सात दिवस अगोदर सचिव लेखी काढतील. ज्यामध्ये सभेची वेळ, ठिकाण नमुद असेल.

कार्यकारी मंडळातील सात सभासद सभेस हजर असतील तर गणपुर्ती झाल्याचे समजणेत येईल. सभेच्या नियोजित वेळेनंतर अर्धा तास गणपुर्ती न झाल्यास सभा निश्चीत दिवशी, ठिकाणी व वेळी पुढे ढकलण्यात येईल व अशा तहकुब सभेची सुचना सर्व सभासदांना देणेत येईल अशा तहकुब सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.

## १५. कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम –

दर पाच वर्षांने सर्वसाधारण सभेत गुप्त मतदान पध्दतीने कार्यकारी मंडळ निवडले जाईल.

## १६. कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरणे बाबत –

राजीनामा, मृत्यू अगर काही कारणास्तव कार्यकारी मंडळातील जागा रिकामी झाल्यास कार्यकारी मंडळाचे सभेत सभासदांमधुन बहुमताने उरलेल्या काळाकरीता भरणेत येईल.

## १७. कार्यकारी मंडळाचे अधिकार आणि कर्तव्ये –

१. संस्थेचे उद्देश अंमलात आणणेकरीता सर्व ते उपक्रम हाती घेणे.
२. शाखा, उपशाखा, समित्या, उपसमित्या नेमणे.
३. आवश्यक तो सेवकवर्ग नेमणे.
४. कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरणे.
५. सर्वसाधारण सभा बोलविणे व संस्थेचे उद्देश अंमलात आणणेकरीता सर्व ते कार्य हाती घेणे.

## १८. संस्थेचा निधी मिळकत विनियोग –

संस्थेस देणगी, खरेदी, दानपत्र इ. व्दारे मिळणाऱ्या रोख वस्तुरूप जंगम मालमत्ता अथवा स्थावर मालमत्तेस संस्थेचा निधी व मिळकत समजणेत येईल.

संस्थेचा निधी व मिळकत संस्थेच्या उद्देशावर विनियोग करणेत येईल.

## १९. उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतुद –

संस्थेच्या एकुण उत्पन्नापैकी ८० टक्के खर्च संस्थेच्या उद्देशावर खर्च करून उरलेले २० टक्के संस्थेच्या आस्थापना खर्चावर करणेत येईल.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

२०. कर्ज किंवा ठेवी या संबंधी तरतुद –
संस्थेकरीता स्थावर मालमत्ता खरेदी अथवा विक्री करणे असल्यास मा. धर्मादाय सह–आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांची पुर्व परवानगी घेणेत येईल.

२१. बँक खाते –
बँक खाते हे संस्थेचे नावे राहील. अध्यक्ष, सचिव, खजिनदार यांचे पैकी दोघांचे संयुक्त सहीने चालविले जाईल.

२२. सभासदांची नोंदवही –
संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ प्रमाणे संस्थेचे जे सभासद असतील अशा सभासदांची यादी संस्था नोंदणी नियम १९७१ चे नियम १५ अनुसार ६ चे नमुन्यात ठेवण्यात येईल.

२३. नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतुद –
संस्थेचे नियम व नियमावलीत बदल करणेचा झाल्यास सर्वसाधारण सभेत ३/५ बहुमताने करणेत येईल.

२४. संस्थेच्या नावात वा उद्देशात बदल करण्याची तरतुद –
संस्थेच्या नावात वा उद्देशात बदल करणे अथवा दोन संस्थेचे विलीनीकरण करणे असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२अ अन्वये करणेत येईल.

२५. विसर्जन –
काही कारणास्तव संस्थेचे विसर्जन करणे असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे करणेत येईल.

## दाखला

असे प्रमाणित करणेत येते की, **ब्रम्हचैतन्य एज्युकेशन सोसायटी** या संस्थेचे नियम व नियमावलीची खरी व बरोबर प्रत आहे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

सही शिक्याची खरी नक्कल

TRUE COPY